भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐ BM 886984

नोंदवही अ.नं. ४१६८ दि. १३/७/२०२३ ५००/-

कोणत्या कारणासाठी घ्यावयाचा आहे भाडे करारनामा

विकत घेणाऱ्याचे संपूर्ण नांव नूर एज्युकेशन सोसायटी मैंदर्गी

पत्ता ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

दुसऱ्या पक्षकाराचे नांव नगीना शाकिर हुसेन काझी

दौंड

खरेदीदाराची सही ..........

जिजु सखाजी सुर्वे

मुद्रांक विक्रेता परवाना क्र.2205008

पत्ता:दौंड,ता.दौंड,जि.पुणे

Sub Treasury Officer Daund

13 JUL 2023

Sub Treasury Officer
Daund, Dist. Pune

## -: लिव्ह अॅन्ड लायसेन्स करारनामा :-

लिव्ह अॅन्ड लायसेन्सचा करारनामा गांव मौजे दौंड,ता.दौंड, जि.पुणे येथील मिळकतीबाबतचा ...

20-06-2023 आज मंगळवार दिनांक 20 माहे जून सन २०२ इसवी ते दिवशी.......



Scanned with OKEN Scanner

१) **हाजी मुस्ताक हाजी मकबुल शाब्दी** )
वय- वर्षे, व्यवसाय - व्यापार, )
२) **हाजी मकबुल उस्मानअली शाब्दी** )
वय- वर्षे, व्यवसाय - व्यापार, ) लिहून घेणार
दोघे रा. दौंड, ता.दौंड,जि.पुणे )

यांसी......

नूर एज्यूकेशन सोसायटी,मैंदर्गी, )
ता.अक्कलकोट,जि.सोलापूर संचलित )
**उस्मान अली शाब्दी उर्दू हायस्कूल दौंड,जि.पुणे**)
करीता ) लिहून देणार
वय- वर्षे, व्यवसाय - नोकरी, )
रा. दौंड, ता.दौंड,जि.पुणे )

HEAD MISTRESS
Usmanali Shabdi Urdu High School
Daund, Dist. Pune - 413801.

कारणे करारनामा लिहून देते की ते खालीलप्रमाणे....,

१) **मिळकतीचे वर्णन :-** गांव मौजे दौंड येथील दौंड नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं. १३५४/१+२ यामधील भुईजागेवर बांधलेली मिळकत ही लिहून घेणार यांचे मालकीची असुन तशी ती त्यांचे नावे सिटी सर्व्हे दप्तरी नोंद आहे. सदरची मिळकत या लिव्ह ॲन्ड लायसेन्सी करारनामाचा विषय असे.

२) लिहून देणार ही सार्वजनिक व शैक्षणिक सामाजिक काम करणारी संस्था असुन, सदर संस्थेचे प्रमुख असुन, सदर संस्थेची नोंदणीकृत कार्यालय नूर एज्युकेशन सोसायटी मैंदगी,अक्कलकोट, जि.सोलापूर हे आहे. सदर शाळेचा संलग्नता नोंदणी क्र.V.L.S.1095/229/PR.TEC.3, Dt. 03/02/1996 असा आहे. सदर शैक्षणिक संस्था चालविण्यासाठी व त्याकामी विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रम चालविणेकामी लिहून देणार यांना सदर मिळकतीची गरज होती. त्याप्रमाणे जागेच्या शोध घेत होते.

३) वर पॅरा नं. १ मध्ये नमूद केलेली मिळकत लिहून घेणार यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची आहे. त्यांनी सामाजिक व सार्वजनिक उपक्रमांची गरज पाहून लिहून देणार यांना १० वर्षे मुदतीवर भाडेपट्टा तत्वाने देण्याचे ठरविले. त्यानुसार उभयंतामध्ये सदर भाडेपटट्याची मुदत दिनांक २०/०६/२०२३ ते दिनांक १९/०६/२०३३ पर्यंत देण्याचे ठरविले.

४) सदर मिळकतीस लिहून देणार यांनी दरमहा (लायसन्स फी) म्हणून रक्कम रूपये ११,०००/- (अक्षरी रूपये अकरा हजार फक्त.............. फक्त) लिहून घेणार यांना देण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर लायसन्स फी दर महिन्याच्या ०१ ते ०५ तारखेस नियमितपणे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना द्यावयाची आहे. तसेच सदर करारान्वये लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना मिळकतीच्या सुरक्षिततेकामी अनामत र. रू. ३,००,०००/- (अक्षरी रूपये तीन लाख हजार फक्त) दिलेली आहे. सदरची अनामत रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कराराच्या मुदतीनंतर परत करणेची आहे.

५)  सदर मिळकतींचा वापर लिहून देणार यांनी शैक्षणिक कामासाठीच करावा, इतर बेकायदेशीर कारणांसाठी करावयाचा नाही. तसेच सदर मिळकतीस अगर तिचे भागास कोणत्याही प्रकारे नुकसानी, अरकत अगर बाधा निर्माण होईल, असे कृत्य करावयाचे नाही. तसेच सदर मिळकतीमध्ये लिहून देणार यांनी कोणतेही थर्ड पार्टी इंटरेस्ट, कर्जबोजे किंवा अन्य स्वरूपाचे कोणतेही क्लेम, अथवा पोटभाडेकरू हक्क निर्माण करावयाचे नाही.

६)  सदर मिळकतीमध्ये असलेल्या लाईटचे बिल लिहून देणार यांनी दरमहा भरावयाचे आहे. सदर घर मिळकतीची नगरपरिषद यांचेकडील सरकारी कर भरण्याची जबाबदारी लिहून घेणार मालक यांची आहे व ती त्यांनी भरावयाची आहे.

७)  बॉम्बे रेन्ट ॲक्ट तरतूदीनुसार लिहून देणार यांना भाडेकरी हक्क कदापि प्राप्त होत नाही, तसा ते सांगणार नाही. असे या करारनाम्यामध्ये लिहून देणार यांनी मान्य व कबुल केले आहे.

येणप्रमाणे आमचे राजीखुशीने व अक्कलहुशारीने सदरचा करारनामा वाचून, समजून, उमजून पूर्ण विचारांती आम्ही साक्षीदारांसमक्ष सह्या केल्या आहेत.

दौंड
दिनांक :- 20/06/२०२३

नूर एज्यूकेशन सोसायटी, मैंदर्गी,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर संचलित
**उस्मान अली शाब्दी उर्दू हायस्कुल दौंड, जि.पुणे**
करीता
(लिहून देणार)

**हाजी मुस्तफा हाजी मकबुल शाब्दी**

**हाजी मकबुल उस्मानअली शाब्दी**
(लिहून घेणार)

**साक्षीदार:-**

१) सही-
नांव :- Mrs. Shaikh Nahid Begum Md. Altaf
पत्ता :- Daund, Dist. Pune

HEAD MISTRESS
Usmanali Shabdi Urdu High School
Daund, Dist. Pune - 413801.

२) सही-
नांव :- Asadali Moulaali Karajgi
पत्ता :- A/p. Daund Dist. Pune

Scanned with OKEN Scanner